सन २०१३-२०१४ या वर्षाचे अतिरिक्त
खर्च नियमानुकूल करण्यासाठी अतिरिक्त
खर्चाचे विवरणपत्र तयार करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन परिपत्रक क्र: अधिक २०१८/प्र.क्र. ६०/अर्थ-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २७ मार्च, २०१८.

परिपत्रक

शासनाने **सन २०१३-२०१४** या वर्षाच्या मंजूर तरतुदीपेक्षा केलेला अतिरिक्त खर्च भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी **सन २०१३-२०१४** या वर्षाच्या विनियोजन लेख्यामध्ये दर्शविला आहे. लोकलेखा समितीने सदर अतिरिक्त खर्च नियमानुकूल करण्याची शिफारस सन २०१७-१८ मध्ये दि. २१ डिसेंबर, २०१७ रोजी विधानमंडळास सादर केलेल्या तिसाव्या अहवालात केलेली असून त्याची विभागनिहाय यादी या अहवालामध्ये दिलेली आहे. (त्वरीत संदर्भासाठी विभागनिहाय यादी सोबत जोडली आहे.)

२. लोकलेखा समितीने नियमानुकूल करण्याची शिफारस केलेल्या अतिरिक्त खर्चाचे विवरणपत्र भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०५(१) (ख) अन्वये विधानमंडळाला सादर करणे आवश्यक असल्याने मंत्रालयातील सर्व संबंधित विभागांना विनंती आहे की, **सन २०१३-२०१४** या वर्षाची अतिरिक्त खर्चाची विवरणपत्रे तयार करण्यासाठी अतिरिक्त खर्चाच्या मागण्या सोबतच्या नमुन्यात या विभागाच्या संबंधित अर्थसंकल्पीय कार्यासनाकडे पाठविण्यात याव्यात. सदर मागण्या पाठवितांना त्यात मागणीच्या सुरुवातीस संबंधित मंत्र्यांचे पदनाम आणि प्रधानशीर्ष, गौणशीर्ष व उपशीर्षनिहाय वर्गीकरण देण्यात यावे. तद्नंतर अतिरिक्त खर्च कोणत्या परिस्थितीत झाला व तो का टाळता आला नाही या विषयी तपशीलवार कारणे देण्यात यावीत. तसेच अतिरिक्त खर्चाचा अंदाज वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी घेऊन पूरक मागणीद्वारे आवश्यक ते अनुदान का मंजूर करुन घेता आले नाही, याचाही खुलासा करण्यात यावा. या संदर्भात सर्व मंत्रालयीन विभागांचे लक्ष शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक एसयुपी-१०८६/अतिरिक्त खर्च/१२८/अर्थसंकल्प-२३, दिनांक ९ जुलै, १९८६ कडे वेधण्यात येत आहे. (सुलभ संदर्भासाठी प्रत सोबत जोडली आहे.) या परिपत्रकातील सूचना विचारात घेऊन सर्व प्रशासकीय विभागांनी **सन २०१३-२०१४** च्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्या वित्त विभागाकडे पाठविताना अतिरिक्त खर्चाबाबतची तपशीलवार स्पष्टीकरणे मागण्यांमध्ये अंतर्भूत करावी अशी विनंती आहे.

३. अतिरिक्त खर्चाच्या मागण्यांच्या मराठी व इंग्रजी प्रत्येकी ३ प्रतीत सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात या विभागाच्या संबंधित अर्थसंकल्प शाखेकडे (अर्थ-६, अर्थ-८, अर्थ-१०, अर्थ-१६, अर्थ-१७, अर्थ-१८) लवकरात लवकर आणि **<u>कोणत्याही परिस्थितीत दिनांक १५ एप्रिल, २०१८ पर्यंत पाठविण्यात याव्यात.</u>** प्रत्येक मागणी ही एका स्वतंत्र कागदावर असावी. मागणीच्या मजकुराच्या दोन ओळीमध्ये पुरेशी जागा (डबलस्पेस) सोडावी. निरनिराळया प्रधानशीर्षाखालील मागण्या वित्त विभागाकडे स्वतंत्ररित्या पाठविण्यात याव्यात. संक्षिप्तरुपे व संक्षेपाक्षरे वापरण्यात येऊ नयेत.

४. अतिरिक्त खर्चाच्या मागण्यांचे प्रारुप संबंधीत विभागाच्या सचिवांनी मान्य केलेले असावे व तसे प्रमाणपत्र मागणी पाठविताना पृष्ठांकनामध्ये अंतर्भूत करावे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharastra.gov.in या बेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्र. २०१८०३२७१०५१३४१२०५ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ravindra Narayan Mali
Digitally signed by Ravindra Narayan Mali
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fa8f1ecdaf4f4b4f47995610b770072fda7e71844e4ff45f11c786239f624b0a, cn=Ravindra Narayan Mali
Date: 2018.03.27 10:53:13 +05'30'

(र.ना.माळी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई -४०० ०३२.

२) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

३) प्रधान सचिव (व्यय), (प्रशा-४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

४) प्रधान सचिव, (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२.

५) प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

६) सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२..

७) वित्त विभागातील सर्व सह सचिव/उप सचिव.

८) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, नियोजन विभाग, महसूल व वन विभाग, जलसंपदा विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभागातील सर्व सह सचिव/उप सचिव (अर्थसंकल्प शाखा).

९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,

१०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,

११) उप सचिव (संसदीय कार्य विभाग), मंत्रालय,मुंबई -४०० ०३२.

१२) अवर सचिव (लोलेस), वित्त विभाग, यांना क्र.लोलेस-२०१८/प्र.क्र.५५/लोलेस दि. १६ मार्च,२०१८ च्या पत्राच्या अनुषंगाने अग्रेषित.

१३) अवर सचिव, लोकलेखा समिती कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई यांना त्याच्या क्र. ६०८/म.वि.स/ लोलेस/ड-१, दि.८ जानेवारी, २०१८ ,च्या पत्राच्या अनुषंगाने अग्रेषित.

१४) कक्ष अधिकारी (अर्थ-६, अर्थ-८, अर्थ-१०, अर्थ-१६, अर्थ-१७, अर्थ-१८ व संगणक शाखा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांचे विभागाशी संबंधित माहिती पाठपुराव्याद्वारे उपलब्ध करुन घेऊन पुढील आवश्यक कार्यवाही तातडीने करावी.

१५) निवडनस्ती, अर्थसंकल्प-३.

-नमुना -

सन .... मध्ये झालेल्या अतिरिक्त खर्चाची मागणी

विभागाचे नांव :-

प्रभारी मंत्री :-

मागणी क्रमांक :-

तपशीलवार लेखाशीर्ष :-

रक्कम :-

बाब :-

टीप :- बाबीच्या अभिप्रायामध्ये अतिरिक्त खर्च कोणत्या परिस्थितीत झाला व तो का टाळता आला नाही ? याबाबतच्या स्वयंस्पष्ट व तपशीलवार कारणे देण्यात यावीत.

Demand for additional expenditure during ....

Name of the Department :-

Minister-in-charge :-

Demand No. :-

Detail Budget Head :-

Amount :-

Item :-

Note:- In remark of Item, in what circumstances excess expenditure was done and why it should be not avoided. The detail & explainatory reasons should be given.

लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ या वर्षाचे
विनियोजन लेखे यावरील

तिसावा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर.
डिसेंबर, २०१७

लोकलेखा समिती

२०१७-२०१८

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ या वर्षाचे विनियोजन लेखे यावरील

तिसावा अहवाल

अतिरिक्त खर्च नियमानूकल करणे

सन २०१३-२०१४

या अहवालामध्ये समितीने इतरत्र व्यक्त केलेल्या अभिप्रायास अधीन राहून खाली दर्शविण्यात आलेला जादा खर्च नियमानुकूल करण्यासाठी आवश्यक ते उपाय योजण्यात यावेत.

खालील प्रकरणामध्ये दत्तमत वा भारित अनुदान/विनियोजनाच्या रक्कमेपेक्षा महसूली / भांडवली लेख्यावरील खर्चाची रक्कम अधिक असल्याचे सन २०१३-२०१४ च्या लेख्यावरुन दिसून येते.:-

(रूपये हजारात)

अ.क्र. (१)	अनुदान/विनियोजनाचे नांव (२)	एकूण अनुदान/ विनियोजनापेक्षा झालेला अधिक खर्च (दत्तमत) (३)	एकूण अनुदान / विनियोजनापेक्षा झालेला अधिक खर्च (भारित) (४)
		(रुपये)	(रुपये)
	ए-महसूल लेख्यांवरील खर्च		
	महसूल व वन विभाग		
१.	सी-२ "मुद्रांक व नोंदणी"	२१,४५,१९	
	वित्त विभाग		
२.	जी-६ "निवृत्तीवेतन व इतर सेवानिवृत्ती लाभ"	३,१९,४९,९५	
	जलसंपदा विभाग		
४.	आय-१ "व्याज प्रदाने"		४२,९५
	ग्रामविकास व जलसंधारण विभाग		
५.	एल-२ "जिल्हा प्रशासन"	१०,०५,८६	
	नियोजन विभाग		
६.	ओ-१५ "जिल्हा योजना, मुंबई उपनगर"	२,२९.००	
७.	ओ-१९ "जिल्हा योजना, सिंधुदुर्ग"	२०,९४	
८.	ओ-२१ "जिल्हा योजना, सातारा"	२२,११,७३	
९.	ओ-२३ "जिल्हा योजना, सोलापूर"	३१,७८,८५	
१०.	ओ-२६ "जिल्हा योजना, धुळे"	७९,१३	
११.	ओ-३१ "जिल्हा योजना, जालना"	३,४२,८२	
१२.	ओ-३२ "जिल्हा योजना, परभणी"	८७,१६	
१३.	ओ-३३ "जिल्हा योजना, नांदेड"	२,८९,९५	
१४.	ओ-३५ "जिल्हा योजना, लातूर"	५,६५,१४	
१५.	ओ-३७ "जिल्हा योजना, हिंगोली"	५७,९९	
१६.	ओ-३८ "जिल्हा योजना, नागपूर"	८,९८,९२	
१७.	ओ-४० "जिल्हा योजना, भंडारा"	१,८१,०८	
१८.	ओ-४१ "जिल्हा योजना, चंद्रपूर"	५,२९,८५	
१९.	ओ-४३ "जिल्हा योजना, गोंदिया"	३,१७,८१	
२०.	ओ-४४ "जिल्हा योजना, अमरावती"	८,८०,०८	

अतिरिक्त खर्च---चालू

(१)	(२)	(३)	(४)
		(रुपये)	(रुपये)
२१.	ओ-४५ "जिल्हा योजना, अकोला"	३,४१,९८	
२२.	ओ-४६ "जिल्हा योजना, यवतमाळ"	११,०४,५२	
२३.	ओ-४८ "जिल्हा योजना, वाशिम"	६८,५८	
	उच्च व तंत्रशिक्षण विभाग		
२४.	डब्ल्यू-७ "प्रादेशिक असमतोल दूर करण्यावरील महसूली खर्च"	७,८७,०३	
	एकूण ए महसूली लेख्यांवरील खर्च	४,७२,७३,५६	४२,९५
	बी- भांडवली लेख्यावरील खर्च		
	महसूल व वन विभाग		
२५.	सी-११ "राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण"		२,९७
	जलसंपदा विभाग		
२६.	आय-६ "राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण"		३१
	नियोजन विभाग		
२७.	ओ-१६ "जिल्हा योजना, ठाणे"	९,०६,५३	
२८.	ओ-१७ "जिल्हा योजना, रायगड"	३,१८,६९	
२९.	ओ-१८ "जिल्हा योजना, रत्नागिरी"	२,९४,४१	
३०.	ओ-२० "जिल्हा योजना, पुणे"	५,७०,८९	
३१.	ओ-२२ "जिल्हा योजना, सांगली"	१,८०,४२	
३२.	ओ-२४ "जिल्हा योजना, कोल्हापूर"	४,३२,७३	
३३.	ओ-२५ "जिल्हा योजना, नाशिक"	६,५४,६८	
३४.	ओ-२७ "जिल्हा योजना, जळगाव"	३६,७२,८३	
३५.	ओ-२८ "जिल्हा योजना, अहमदनगर"	३९,३०,५७	
३६.	ओ-२९ "जिल्हा योजना, नंदुरबार"	८९,४८	
३७.	ओ-३० "जिल्हा योजना, औरंगाबाद"	७,५६,६९	
३८.	ओ-३६ "जिल्हा योजना, उस्मानाबाद"	१,९३,४८	
३९.	ओ-४२ "जिल्हा योजना, गडचिरोली"	१,३४,३१	
४०.	ओ-४७ "जिल्हा योजना, बुलढाणा"	१०,१०,३५	
	एकूण(बी) भांडवली खर्च . .	१,३१,४६,०६	३,२८
	एकूण (ए) + (बी) . .	६,०४,१८,८२	४६,२३

तळटीप :-समितीने जेव्हा जादा खर्च नियमानुकूल करण्याविषयी शिफारस केलेली असते, अशा वेळी समितीने यापूर्वी केलेल्या शिफारशीनुसार (सन १९५३-५४ "च्या विनियोजन लेख्यावरील अहवालांचा परिच्छेद १० पहा.) ज्यामुळे कोणताही जादा खर्च नियमानुकूल करणे आवश्यक ठरते किंवा टाळता येते अशा प्रकारचे लेख्यांवरील कोणतेही प्रस्थापित गैरवर्गीकरण हिशेबात घेणे आवश्यक आहे. म्हणून अशा प्रकारे गैरवर्गीकरणाच्या रकमा हिशेबात घेऊनच वर दर्शविण्यात आलेल्या रकमा काढण्यात आलेल्या आहेत.

अधिक खर्चाच्या मागण्यांमध्ये अधिक
खर्चाचा संपूर्ण तपशील देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
परिपत्रक क्र. एसयूपी-१०८६/अतिरिक्त खर्च/१२८/अर्थसंकल्प-२३
वित्त विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ९ जुलै, १९८६.

परिपत्रक

१९८०-८१ च्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्यांवरील विधानसभेतील चर्चेच्यावेळी कांही सदस्यांनी अतिरिक्त खर्चाची सविस्तर कारणे व प्रत्येक कारणासाठी झालेल्या अतिरिक्त खर्च स्वतंत्रपणे दर्शविण्याची मागणी केली होती. या मागणीची पूर्तता करण्याकरिता, वित्त विभागाने परिपत्रक क्र. एसयूपी-१०८५/अतिरिक्त खर्च/८१-८२/१४७/बीयुडी-३, दिनांक ८ मे १९८५ निर्गमित करुन सर्व विभागांना अशी विनंती केली होती की, १९८१-८२ च्या अतिरिक्त मागण्या वित्त विभागाकडे पाठवितांना, वर उल्लेखिल्याप्रमाणे सर्व तपशील पूर्ण स्वरुपात अतिरिक्त मागण्यांमध्ये समाविष्ट करण्यात येईल, याची मंत्रालयीन विभागांनी दक्षता घ्यावी. असे असूनसुध्दा कांही विभागांनी १९८१-८२ च्या अतिरिक्त मागण्या सादर करतांना खर्चाचा तपशील व कारणे दर्शविली नव्हती. त्यामुळे १९८१-८२ च्या अधिक खर्चाची कारणे मागणी करुनसुध्दा तपशीलवार दिली जात नाहीत, अशी तक्रार पुन्हा केली. त्याप्रसंगी अधिक खर्चाच्या मागण्यांमध्ये अधिक खर्चाची तपशीलवार कारणे यापुढे देण्यात येतील, असे आश्वासन मा. वित्तमंत्र्यांनी सभागृहात दिले आहे. तरी सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी यापुढे अधिक खर्चाच्या मागण्या पाठवितांना त्यामध्ये अधिक खर्चाचा उपशिर्षनिहाय तपशील देऊन प्रत्येक कारणांसाठी झालेला अधिक खर्च वेगळा दर्शविला जाईल याची खबरदारी घ्यावी.

सही/-
(मो.द. तेंडुलकर)
उप सचिव, वित्त विभाग

प्रति,

१) सर्व मंत्रालयीन विभाग,
२) कार्यासन अधिकारी, सर्व प्रशासन कार्यालये, वित्त विभाग,
३) कार्यासन अधिकारी, अर्थसंकल्प-७, अर्थसंकल्प-१५, वित्त विभाग,
४) निवड नस्ती, अर्थसंकल्प-१८.